IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

# तत्वचिंतन आणि आत्मानुभूती ह्यांचा मनोहारी मिलाफ-पैस

**डॉ. सुजाता सचिन कुळकर्णी**
**कोकण ज्ञानपीठ**
**कर्जत कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, कर्जत, रायगड**
**sujatakulkarni60@gmail.com**

एकाचवेळी आल्हाददायक आणि तितकेच धीर-गंभीर तत्वज्ञान, इतिहास, मानववंशशास्त्र, लोककला,धर्मइत्यादी विषयांचा व्यासंग, निखळ निसर्गवर्णन, आत्मानुभूती आणि प्रतिभेचा विलक्षण विलास आशा बहुविधविशेषांचाआविष्कार हे दुर्गा भागवत ह्यांच्या ' पैस' ह्या ललित गद्यलेखन परंपरेतील लेखसंग्रहाचे वर्णन करतायेईल. सदर लेख वाचताना आपण एखादा विषयवाचत आहोत असं वाटतच नाही तर एखाद्या शांत ठिकाणीबसल्यावर दुरून एखादा मंजुळ स्वर कानावर पडल्यावर जसं वाटतं अगदी तीच अनुभूती यावेळी येते.पैस व्यासपर्व, भावमुद्रा ऋतूचक्र ही त्यांची पुस्तके वाचकांसाठी पर्वणीच म्हणता येतील. त्यांची पुस्तकं याचगोष्टीची साक्ष देतात स्वान्तसुखायच लिहिले असावे असे लेख वाचताना जाणवत राहते.

१९७० साली प्रकाशीत झालेल्या 'पैस ' या पुस्तकासाठी दुर्गा भागवत यांना १९७१ सालचा साहित्यअकादमी पुरस्कार मिळाला.' पैस ' या ललित लेखांच्या संग्रहातील लेख या आधी मौज, साधना, केदार, सत्यकथाइत्यादी मासिकांतून आधी प्रकाशित झालेले होते. दुर्गाबाई भागवत या एक विदुषी म्हणून ओळखल्या जातात.त्यांचे प्रत्येक कार्य सखोलपणे केलेले असते. दुर्गाबाईंच्या प्रदीर्घ प्रस्तावनांमुळेही अनेक वाचकांना त्या परिचित आहेत.'पैस' या ललित पुस्तकात जे दुर्गाबाईंचे निवडक लेख निवडले आहेत तो एक वेगळाच आस्वाद आहे.कोणताही लेख स्वतंत्र वाचताना एका परिपूर्ण विषयाची कल्पना जशी येते; तशीच सर्व लेखांचे एक समान सूत्रआहे हे देखील जाणवते. 'भारतीय संस्कृती' ह्या एका धाग्यात सर्व लेख गुंफलेले दिसतात.

स्वच्छंद, पैस, पंढरीचा विठोबा, द्वारकेचा राणा, यमुना-कालिंदी, नैनीच्या पुलावर, महेश्र्वरचीमहाश्र्वेता, ख्रिस्त-संगत, डोंगर माथ्यावर, ऊनपारखी, आसन्नमरण काळी राणी, बुद्ध प्रलोभन अशा एकूण १३ललित लेखांचा हा संग्रह आहे. पण प्रत्येक प्रकरण वाचकाला एका वेगळ्याच विश्र्वात नेऊन सोडते.

दुर्गाबाईंनी आपल्या खास शैलीत प्रत्येक प्रकरणात जी शब्दांची पेरणी केली आहे ती मुळातूनचवाचण्यासारखी आहे. त्यांचे ललित लेखन वाचताना दुर्गाबाई आपल्याला एका वेगळ्याच उंचीवरचे तत्त्वज्ञानहीदेतात.

'पैस ' मधल्या विविध लेखांना एकवटणारे सूत्र दुर्गाबाईना प्रतीत झालेल्या धर्मकल्पनांच्या वेधाचे आहे.त्यांचे एका व्यापक, प्रगल्भ अर्थाने धर्मपरतेकडे जाणारे मन त्यातून अभिव्यक्त होते. विद्वत्तेचा रसार्द्र, ललित आविष्कारअसे त्याचे वर्णन करता येईल. पैस म्हणजे दुर्गाबाईंच्या ललित लेखनाचा एक उत्कर्षबिंदू आहे.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

'पैसाचा खांब' या लेखावरूनच पुस्तकाला 'पैस' नाव दिले आहे. 'यालाच टेकून ज्ञानोबाने पैसाची मर्यादापाहिली, काल व अवकाश यांची सीमारेषा जोखली आणि मानवाच्या अंतःस्थ गहनतेची अमर्यादता अनुभवली.खोली आणि उंची, रहस्य आणि खुलेपणा, गूढ व / प्रांजळ, वेदना व सुख, मृत्यू आणि जीवन, भोळेपणा व ज्ञानयांतले ऐक्य टिपले ... ' १अशी पैस' ची भूमिका दुर्गाबाई स्पष्ट करतात.

ज्या खांबालाटेकून संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिलीत्याला 'पैसाचा खांब' म्हणतात वारकरी संप्रदाय आणि बौद्धधर्माचा कसा संगम होतो हे त्यांनी या लेखात सांगितलेआहे. भक्ती आणि अध्यात्म, तत्वज्ञान आणि संस्कृती ह्यातील परस्पर नात्याचे चित्रण ह्या लेखातून येते.

ज्ञानेश्वरांनी ज्या खांबाला टेकून ज्ञानश्वरी सांगितली त्या छोट्या खांबावरच्या पूर्ण अवकाशाला ज्ञानेश्वरपैस म्हणतात. ह्या पैस शब्दाला इतर संतांपेक्षा निराळेच परिमाण ज्ञानेश्वर देतात असे निरीक्षण दुर्गाबाईनोंदवितात. ह्याच लेखात ज्ञानेश्वरीत आलेले चार खास ज्ञानेश्वरांचे शब्द -महाशून्य सहनसिद्धी, दुःख-कालिंदी,ज्ञानमित्र याविषयी थोडक्यात पण अतिशय मर्मग्राही विवेचन दुर्गाबाईंनी केले आहे.

'स्वच्छंद'ह्या पहिल्याच लेखात स्वान्तसुखाय लेखनाची, लेख लिहिण्याच्या ऊर्मीची आणि हे लेखलिहिण्याची सुरुवात कशी झाली हे दुर्गाबाई सांगतात. आत्मकथनपर लेखन असे ह्या लेखाचे स्वरूप म्हणता येईल.दुर्गाबाईंच्या सहज सुलभ लेखनशैलीमधून त्यांच्या लेखन प्रक्रियेच्या प्रवासाची सुरवात आणि त्यांच्यावरीलविविध व्याक्तीमत्वांचा प्रभाव येथे प्रकर्षाने जाणवतो. त्यांच्या वाङमयीन व्यक्तिमत्वाच्या जडणघडणीचा हा एक प्रवास म्हणता येईल.

'पंढरीचा विठोबा' लेखामध्ये त्यांच्याच शब्दात सांगायचे तरअध्यात्माचा पूर्ण अभाव असल्याने दुर्गाबाई त्यांच्यामूळगावी म्हणजे पंढरपुरात त्यांचा जुना वाडा पहाण्याच्या निमित्ताने जातात. या लेखात लेखिका पदूबाईचीलोककथा सांगतात, (रा. चिं. ढेरे यांच्या विठ्ठल एक महासमन्वयक या पुस्तकात वाचावयास मिळते) एकीकडेविठ्ठल रुक्मिणीतील अंतस्थ नाट्य शोध आणि दुसरीकडे "पंढरीच्या विठोबाचे व माझे पिढ्यांचे आंतरिक नातेनव्याने उजळले " २अशा शब्दात आपल्या गावच्या घराशी जुळलेला अनुबंध त्या व्यक्त करतात.

या लेखात विठ्ठल आणि रुक्मिणीच्या लोककथेच्या माध्यमातून विठ्ठलाच्या मानवी रूपाचा शोध त्या करताना दिसतात. दैवत कथेच्या माध्यमातूनपती-पत्नीच्या नात्यातील बंधाचे सहज सुंदर दर्शन घडविते.

'काळ्या मातीवर हुकुमत चालवणारा काळा पाषाण सजीव झाला होता. तो मानवमूर्ती झाला होता.तोच देवमूर्ती झाला होता. पंढरीच्या विठोबाचे व माझे पिढ्यांचे आंतरिक नाते नव्याने उजळले.' ३

विठ्ठलाविषयीचा भक्तिभाव, श्रद्धा भाव व्यक्त करताना त्याच्याशी निर्माण झालेला भावबंध लेखातून व्यक्त होताना दिसतो.

'जोगवा' हा ह्या पुस्तकातला सगळ्यात छोटा पण अर्थवाही लेख आहे. दुर्गाबाईंच्या प्रगल्भ निरीक्षण शक्तीची प्रतीती देणारा हा लेख आहे. आध्यात्म आणि मानवी भावविश्र्वाचा मनोहारी मिलाप येथे दिसतो

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

'द्वारकेचा राणा ' ह्या लेखात द्वारकेचा राणा, द्वारकेतले एकूण वातावरण आणि वाळूमय गोमती नदी बघूनलेखिका भयचकित झाल्या आहेत, तेव्हा त्यांना आठवणारी मीरा आणि त्यातून लिहिलेली भगवान व भक्तयांच्यातील भानगड लांबूनच पाहण्यासारखी नि कोरड्या काव्यात वाचण्यासारखी अशी वाक्य स्तिमितकरतात. द्वारकेचा राणा आणि चिरंतन दुःख याचे कारण नंतर दुर्गाबाईंना भागवतपुराणातील दशम स्कंधातसापडते. लेखाचा शेवट उत्तर पुराणातल्या गोष्टीने त्या करतात.

'यमुना-कालिंदी' या लेखात स्वत:यमुनेच्या काठी राहिल्यावर आलेले अनुभव दुर्गाबाई व्यक्त करतात. त्याचबरोबर यम आणि यमीची गोष्ट सांगून यमीम्हणजेच यमुना अशीही नोंद त्या करतात. कदंब वृक्षाचे आणि यमुनेचे नातेही त्या स्पष्ट करतात. कालिंदी, गोपीआणि वृंदावन यांचा जिवंत अनुभव देणारा असा हा लेख आहे असे म्हणता येईल.

"तुझे कुरळ केश हे डुलति मारुतें मंद या
कालिंदनगकन्यकालहरि का वहातात या." ४

कालिंदीच्या लहरीतील मरणसौंदर्य उलगडताना यम - यमीच्या मिथक कथेतील कारुण्य दुर्गा भागवत यमुना-कालिंदीया लेखातून उलगडतात

'नैनीच्या पूलावर'हा प्रवासवर्णनपर अश्या स्वरूपाचा असणारा लेख आहे. दुर्गाबाईंमधील एक प्रतिभावानकवयित्री, भारतीय संकृतीच्या सामर्थ्यावर विश्र्वास असणारी आणि निखळ माणूसपण जपणारी विचारवंत व्यक्तीअश्या विविध रूपांचे दर्शन घडते. फाळणीच्या पार्श्वभूमिवरील दंग्याचे वर्णन येथे आले आहे. 'महेश्र्वरची महाश्र्वेता' या लेखात दुर्गाबाई अहिल्याबाई होळकरांची ओळख करून दिली आहे. सहृदय माणूस, निस्पृहवृत्तीची शासनकर्ती अशी अहिल्याबाइंची ओळख वाचकाला करून देतात.

'ख्रिस्त- संगत' दुर्गाबाईंच्या व्यक्तिमत्वाची वेगळीच ओळख करून देणारा लेख आहे. संकरी हिंदू आणित्यातून तयार होणाऱ्या श्रद्धेतून येणारे संस्कार आणि शाळेत असल्यापासून मनावर बिम्बवण्याचा प्रयत्न झालेलेख्रिश्चन संस्कार यातून झालेल्या मानसिक संघर्षातून निर्माण झालेला समन्वय अतिशय मार्मिक शब्दात येथे शब्दांकित झाला आहे.

' डोंगर माथ्यावर ',' आसन्नमरण काळी राणी ' आणि ' बुद्ध प्रलोभन ' ह्या तीन लेखात दुर्गाबाई गौतम बुद्ध, बौद्धसंप्रदाय आणि बौद्ध लेणी याविषयी मौलिक माहिती पुरवितात. कथा सांगतात, बुद्ध जीवनातले अनेक प्रसंग सांगतात, पूर्ण बुद्ध कथा सांगतात. वाचक अंतर्मुख होत भारतीय संस्कृतीच्या संचिताची आणि सामर्थ्याचीअनुभूती ह्या लेखांमधून घेतो.

'डोंगर माथ्यावर' सारख्या लेखातून वर्णनातील चित्रमयता, काव्यात्म शैली, ऐंद्रिय संवेद्य प्रत्यायानुभूती,बुद्धलेण्यातील चीरशांतीची अनुभूती, मृत्युविषयीचे चिंतन, वर्तमानातून मानवाच्या आदिम कालापर्यन्तच्याप्रवासाचे चिंतन, लौकिकाकडून पारलौकिक विश्र्वापर्यंतचे आत्मचिंतन आणि बौद्ध तत्वज्ञानाचा प्रभाव असे दुर्गाभागवतांच्या लेखनाचे विविध विशेष प्रकट होतात.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
Impact Factor: 7.53
Volume 4, Issue 3, March 2024

‘ ऊनपारखी ’ सारख्या लेखात दुर्गाबाई प्रत्यक्ष मराठवाड्यातील अजिंठा आणि वेरूळ लेण्यांची सफर करूनआणतात. कैलास लेण्याचे विशेष नोंदवताना कलावंताच्या सर्जनशीलतेतून घडलेल्या बुद्धमूर्तीला प्राप्त झालेलेविशेष. अवघ्या जगाला भारून टाकण्याची तिची किमया ह्यांचे मनोज्ञ दर्शन घडवतात. पुराणकथा आणि वास्तवता ह्यांतील सहसंबंध, त्यामागील तत्वचिंतन, देहमनाने घेतलेला कैलास लेण्याचा अनुभव, त्यातून मिळालेल्या तृप्तीचे सुख ह्यांचे वर्णन असे ह्या लेखाचे स्वरूप दिसते.

‘ आसन्नमरण काळी राणी ’ हा लेख गौतम बुद्ध आणि त्यांची पत्नी यशोधराह्यांच्या नात्याचे चित्रण करणारी आहे.‘सार्‍या विश्र्वाला शांती आणि करुणेचा संदेश देणार्‍या बुद्धाचा राजपुत्र गौतम’ ते ‘ मोह मायेवर विजयमिळवणारा थोर विभूती बुद्ध’ हा प्रवास जसा खडतर तसाच त्याच्या पत्नीचा म्हणजेच याशोधारेचागौतामाशिवायचा जीवनप्रवास दुष्करच होता. त्याच्या विरहाने व्याकुळलेल्या याशोधारेच्या आर्त दुःखाचीकहाणी येथे दुर्गाबाई चित्रित करतात.

ललित वाचनाचा निखळ आनंद असे दुर्गाबाई भागवत ह्यांच्या ‘ पैस’ चे वर्णन करता येईल. एखाद्याप्रवासवर्णानातून, कधी व्यक्तिगत आयुष्यातील अनुभवकथनातून कधी एखाद्या व्यक्तीचित्रणातून किंवा भावस्पर्शी निसर्गवर्णनांतून दुर्गाबाईनी भारतीय संस्कृतीचे केलेले विश्र्वेषण असे ‘ पैस’चे वर्णन करता येईल.

**संदर्भ ग्रंथ**

१ पैस,दुर्गा भागवत,मौज प्रकाशन,मुंबई,चवथी आवृत्ती १९९९ पृष्ठ २३,२४
२ तत्रैव पृष्ठ ४३
३ तत्रैव पृष्ठ ४३
४ तत्रैव पृष्ठ ५९